REG.NO. : MAHBIL/2012/54586 UGC Approval No. 63299 ISSN: 2319-5525

# संशोधन चेतना
# SANSHODHAN CHETANA

VOL: 7th, Special ISSUE, ENGLISH-MARATHI, QUARTERLY : 29th Dec. 2018

## Special Issue on
## "Future Nation Builders: Higher Education Institutions"




संपादक डॉ. सुनिता मगरे

University of Mumbai

Re-accredited with 'A' Grade by NAAC

**One Day International Seminar**

ON

# "FUTURE NATION BUILDERS: HIGHER EDUCATION INSTITUTIONS"

**29th December 2018**

Organised by

Adarsh Shikshan Prasarak Mandal

**Shri Bapusaheb D. D. Vispute College of Education, New Panvel**

NAAC Accredited with 'B' Grade

## (Internal Quality Assurance Cell (IQAC))

In Association with

## Department of Education

## University of Mumbai, Kalina, Mumbai

**We are pleased to invite all Teachers at University/Colleges/Institutions/Schools, Research Scholars and M.Ed. Students to attend the one day international seminar on 29th December 2018.**

**CONVENOR**

| | |
|---|---|
| Dr. Seema Nivrutti Kamble<br>Principal,<br>Shri Bapusaheb D. D. Vispute College of Education, New Panvel. | Dr. Sunita Magre<br>Professor & Head, Department of Education, University of Mumbai, Mumbai. |

**Seminar Venue:**

**Shri Bapusaheb D. D. Vispute College of Education,**
**Multipurpose Hall, 4th Floor, Adarsh, Plot No. 41, Sector 15, Near Panvel Railway Station, New Panvel.**

# Index


| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Return of Higher Education: Investment in Basic Education | Dr. Sunita Magre & Dr. Reni Francis | 1 to 6 |
| 2 | Integrating Digital technology in Higher Education | Dr. Meena Prakash Kute | 7 to 8 |
| 3 | Quality parameters for excellence, consistency and achievements of teacher education | Dr.Sonkamble C.P | 9 to 14 |
| 4 | Use of Social Networking Sites by Research Scholars | Mrs. Anjali G.Kirkinde & Dr. Sunita Magre | 15 to 19 |
| 5 | Inclusion in Higher Education : Incorporating the lost, last and least | Ms. Pavitra Shetty & Dr. Indu Garg | 20 to 25 |
| 6 | Massive open online courses: Advantages and Diadvantages | Ms. Archana Khade | 26 to 31 |
| 7 | Research in Higher Education | Dr. Pawar Yogendra Vasantrao | 32 to 34 |
| 8 | Impact of Liberalization on Higher Education in India. | Dr. Ankush Aundhakar | 35 to 36 |
| 9 | Integration Of Digital Technology for Teaching Learning Process In Higher Education | Dr. Rekha Jagdale & Mr.Prafull M Joshi | 37 to 42 |
| 10 | Significance of Research in Higher Education | Dr. Sharad Sahhbrao Phulari | 43 to 49 |
| 11 | Quality Assurance In Higher Education | Dr. Seema N. Kamble | 50 to 56 |
| 12 | Digitalization.... Beyond Imagination | Ms. Isha Sachin Thakare | 57 to 63 |
| 13 | Issues Of Access, Quality And Equality In Higher Education In India | Ms. Jayshree Premji Shah | 64 to 72 |

| | | | |
|---|---|---|---|
| 27 | उच्च शिक्षणातील समावेशक शिक्षणाचा पाया व सद्यस्थिती | Ms. Aprna Kamble | 149 to 157 |
| 28 | उच्चशिक्षणामध्ये विविध योजना व त्यामध्ये राज्य व केंद्रशासनाची भूमिका | प्रा. छाया शिवाजी शिरसाट व श्री बापुसाहेब डी.डी. विसपुते | 158 to 165 |
| 29 | "उच्च शिक्षणावर व्यापारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण आणि उदारिकरण याचा प्रभाव " | डॉ.कुसुम व्ही. चौधरी | 166 to 177 |
| 30 | उच्च शिक्षणात केंद्र व राज्य सरकारची धोरणे व भूमिका | सौ. नेहा नरेंद्र म्हात्रे | 178 to 183 |
| 31 | उच्च शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना सोयी सवलती व शिक्षकाची भूमिका | श्री. प्रशांत गजानन पाटील | 184 to 191 |
| 32 | उच्च शिक्षणाचे : व्यापारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण आणि उदारीकरण. | Ruta Rohan Raul | 192 to 201 |
| 33 | "उच्च शिक्षणातील गुणवत्ता आणि आव्हाने" | सौ. साक्षी सुरेश गोळे | 202 to 212 |
| 34 | जागतिकीकरण आणि जागतिक शिक्षण | श्रीमती बुटले एस.एन. | 213 to 217 |
| 35 | उच्च शिक्षणात मूल्य शिक्षण संदर्भात संबंधित व्यक्तींच्या भुमिका | समीर शंकर म्हात्रे | 218 to 222 |
| 36 | कला शाखेतील एफ.वाय.बी.ए.मध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांना मराठी विषयाचे अध्यापन करताना प्राध्यापकाला येणा-या अडचणींचा अभ्यास | डॉ. भाऊसाहेब सोपान आंधळे | 223 to 233 |
| 37 | 'उच्च शिक्षणाच्या विकासासाठी शालेय स्तरावरील समावेशित शिक्षण" | डॉ. सोनुने एस.एस. | 234 to 242 |
| 38 | उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीकोनातून विचार | Dr.Dayaram D.Pawar | 243 to 248 |

३७

# "उच्च शिक्षणाच्या विकासासाठी शालेय स्तरावरील समावेशित शिक्षण"

डॉ. सोनुने. एस. एस.
प्राध्यापक शिक्षणशास्त्र विद्याशाखा
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक

## प्रस्तावना-

शिक्षणाचा अधिकार २००९ प्रमाणे समाजातील सर्वच बालकांना शिक्षण घेणाचा अधिकार प्राप्त झाला आहे. त्याप्रमाणे शिक्षणाच्या अधिकार २००९ ची कार्यवाही शासनाकडून केली जात आहे. समाजातील सर्वत बांलकाचा शालेय शिक्षणाच्या माध्यमातून विकास व्हावा यासाठी सर्वसमावेशक शिक्षण ही संकल्पना पूढे आली आहे. सदरील शिक्षणाच्या माध्यामातून विशेष गरजा असणा-या व दिव्यांग बालकांमध्ये आत्मविश्वास निर्माण होईल तसेच त्यांची समाजाकडून सामाजिक व सांस्कृतिक स्विकृती होईल.

सर्वसमावेशक शिक्षण देतांना अध्यापकासमोर अनेक प्रकारची आव्हाने उभी आहेत ,जसे दिव्यांगाच्या प्रकारानुसार अध्यापन कसे करावे, तसेच प्रत्येक अध्ययनार्थीला कशा पध्दतीने हाताळावे. प्रत्येक अध्ययनार्थींचे मूल्यमापन कसे करावे. याशिवाय सर्वसमावेश शिक्षणाचा हेतू साध्य करण्यासाठी शालेय स्तरावर भौतीक ,मानवी व आर्थिक सुविधा उपलब्धता ही आवश्यक व गरजेची ठरते. सदरील पेपरमध्ये याच दृष्टीकोनातून विचार मांडलेला आहे.

## संशोधन विषयाची गरज व महत्व :-

विशेष गरजा असणा-या व दिव्यांग बालकांना सर्वसामान्य शाळेतील मुलांबरोबर शिक्षण देऊन, त्याच्यांत आत्मविश्वास निर्माण करणे व विशेष व दिव्यांग अध्ययनार्थ्यांविषयी समाजात सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या आदराची भावना निर्माण करणे म्हणजेच समाजात समावेशनाची भावना निर्माण करणे. तसेच त्यांना समाजात आत्मविश्वासाने उभे राहण्यासाठी तयार करणे हा समावेशित शिक्षणाचा महत्वाचा उद्देश आहे.



Vol: 7th , Special Issue , English-Marathi, Quarterly: 29th Dec 2018,ISSN : 2319-5525
UGC Approval No. 63299

म्हणजेच शालेय स्तर दिल्या जाणा-या समावेशित शिक्षणातून सामाजिक व सांस्कृतिक समता निर्माण होण्यास मदत होईल. त्यामुळेच शालेय स्तरावर दिले जाणारे समावेशित शिक्षण हे महत्वाचे व गरजेचे ठरते. तसेच सर्वसमावेश शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या भौतीक ,मानवी ,तसेच आर्थिक पूर्तता करण्याच्या दृष्टीने व आवश्यकत्या सुविधाची गरज व महत्व स्पष्ट करण्यासाठी सदरील संशोधन विषय गरजेचा व महत्वाचा ठरतो.

## संशोधन विषयाची उद्दिष्टे –

१) शालेय स्तरावरील सर्व समावेशित शिक्षणाचे महत्व विशद करणे

२) समावेशित शिक्षणासाठी भौतीक सुविधा ,मानवी सुविधा तसेच आर्थिक सुविधांच्या उपलब्धतेचे महत्व स्पष्ट करणे.

## गृहितक:-

१) सर्वसमावेशक शिक्षणाच्या यशस्वितेवर उच्च शिक्षणाची यशस्विता अवलंबून आहे.

## पारिभाषिक शब्द –

१) सर्वसमावेशित शिक्षण – सर्वसामान्य शाळेत सर्वच बालकांना दिले जाणारे शिक्षण म्हणजे .

२) सामान्य विद्यार्थी –कोणत्याही प्रकारचे दिव्यांग नसणारे व अध्ययन करण्यासाठी सक्षम असणारे विद्यार्थी.

३) दिव्यांग बालक – दिव्यांगजन अधिकार अधिनियम २०१६ प्रमाणे दिव्यांग प्रकारानुसार निश्चित झालेले बालक.

(अंध Blindness (२) अल्पदृष्टी Low-vision (३) कुष्ठरोग Leprosy Cured Persons (४) कर्णबधिर Hearing Impairment (deaf and hard of hearing) (५) अवयवातील कमतरता Loco motor Disability (६) बौद्धिक वाढ



Vol: 7th , Special Issue , English-Marathi, Quarterly: 29th Dec 2018,ISSN : 2319-5525
UGC Approval No. 63299

केला गेला आहे.

संशोधन कार्यपध्दती - दस्तऐवज विश्लेषीकरण पध्दती

सदरील विषयावर विचार व संशोधन विषयावर लिहित असतांना दस्तऐवज विश्लेषीकरण पध्दतीचा वापर केला आहे. त्यासाठी उपलब्ध झालेल्या दस्तऐवजाबाबत वाचन ,विमर्षी चिंतन करून ,सामान्य शाळेतील विद्यार्थी व विशेष शाळेतील विद्यार्थी यांच्या बाबत विचार व दोन्ही शाळेत आवश्यक असलेल्या सुविधा बाबत चा तुलनात्मक विचार करून सदरील पेपरमधील आशय घटकांची मांडणी केली आहे. ज्या बाबींची शालेय स्तरावरील सर्वसमावेश शिक्षणासाठी आवश्यकता आहे. त्या बाबी घटक निहाय मांडण्यात आल्या आहेत.

शालेय स्तरावर समावेशित शिक्षणाची अंमलबजावणी करीत असतांना विशेष व दिव्यांग व सर्वसामान्य मुलांच्या गरजांचा व त्यांच्या सामाजिक पार्श्वभुमीचा विचार करणे गरजेचे आहे. कारण अशा विविध प्रकारच्या अध्ययनार्थींच्या विकासाचा विचार करतांना त्यांच्या व विशेष गरजांचा देखिल विचार करणे गरजेचे ठरते. त्यामुळे सर्वसामान्य शाळेत सामान्य व विशेष व दिव्यांग अध्ययनार्थींना शिक्षण देतांना खालील प्रकारच्या भौतीक सुविधा ,मानवी व आर्थिक सुविधा शाळेत उपलब्ध करून देणे आवश्यक व गरजेचे आहे.

१)भौतीक सुविधा –

भारताचे भविष्य शाळा - शाळांमधून घडते आहे,असे कोठारी आयोगाने म्हटले आहे. यांचा अर्थ शाळा म्हणजे चार भिंतीच्या आतील बंदिस्त वातारण असा नाही. तर अध्ययनार्थींच्या अध्ययनासाठी शाळेत उपलब्ध असलेल्या विविध सोयी - सुविधाच्या द्वारे अध्ययन- अध्यापनाचे ठिकाण. सामान्य शाळेतील अध्ययनार्थी पेक्षा काही वेगळ्या सुविधा सर्वसमावेशक शिक्षण देतांना शाळेत निर्माण कराव्या लागतील किंवा पूरवाव्या लागतील. जसे की दिव्यांग अध्ययनार्थींसाठी त्याच्या प्रकारानुसार अध्ययन साहित्य. शाळेतील अध्ययनार्थींची बैठक व्यवस्था, अध्ययन -अध्यापनाची साधने उदा.अल्पदृष्टी असलेल्या अध्यनार्थींसाठी मोठी अक्षरे असलेली पुस्तके, विविध प्रकारची दृक-श्राव्य साधने,

खुंटणेDwarfism (७) मानसिक आजार Mental Illness (८) बौद्धिक विकलांगता Intellectual Disability (९) आत्ममग्नता Autism Spectrum Disorder (१०) बहुविकलांगता Cerebral Palsy (११) स्नायूंची विकृती Muscular Dystrophy (१२) तीव्र मज्जासंस्थेसंबंधित परिस्थिती Chronic Neurological Conditions (१३) अध्ययन अक्षमता Specific Learning Disabilities (१४) मल्टीपल स्केलेरोसिय Multiple Sclerosis (१५) भाषण व भाषा अपंगत्व Speech and Language Disability (१६) थॅलेसेमिया Thalassemia (१७) हिमोफिलिया Hemophilia (१८) सिकल सेल रोग Sickle Cell Disease (१९) बहुविकलांगता Multiple Disabilities including deaf blindness (२०) ॲसिड ॲटॅक बळी Acid Attack Victim (२१) पार्किन्सन रोग Parkinson's disease

४) सामाजिक व सांस्कृतिक समावेशन - विशेष गरजा असणा-या व दिंव्यांग मुलांचा सामाजिक व सांस्कृतिक दृष्टया स्विकार करून, त्यांना समान संधी देणे, त्यांचा सामाजिक व सास्कृतिक कार्यात सहभाग घेणे.

५) अध्ययनार्थी - सर्वसमावेशक शाळेत शिक्षण घेणारा म्हणजे अध्ययनार्थी

६) पझल- बौध्दीक अक्षम अध्ययनार्थीचे अध्ययन -अध्यापनाचे साधन.

## संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा -

सदरील संशोधन विषयाच्या आशयाची व्याप्ती सर्वसमावेशक शिक्षणापूरतीच आहे.

मर्यादा-

१) सदरील संशोधन विषयात फक्त सर्वसमावेशक शिक्षण देणा-या शालेय शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या मानवी, भौतीक व आर्थिक सुविधा बाबतीत विचार



Vol: 7th, Special Issue, English-Marathi, Quarterly: 29th Dec 2018, ISSN : 2319-5525
UGC Approval No. 63299

विविध भिंग, ब्रेल लिपीची पुस्तके, पुस्तक वाचन मशिन (book reading machine) ,स्पर्शज्ञान विविध शैक्षणिक साहित्ये. बौध्दिक अक्षमता (मतिमंदता असलेले विद्यार्थी) असलेल्या विद्यार्थ्यासाठी पझल, लाकडी ठोकळे ,रंगीत चित्रे, इतर दृक-श्राव्य साधने, विद्युत व्यवस्था व बौध्दीक अक्षमतेच्या तीव्रतेनुसार शैक्षणिक साधनांमध्ये बदल करून वा नवीन साधन निर्माण करून साधने वापरावी लागतात. तसेच कर्ण बधिर (मुक-बधिर) अध्ययनार्थींसाठी मोठ्या आवाजातील स्पिकर यंत्रणा व श्रवण यंत्रणा (वैयक्तीक मायक्रो फोन) या शिवाय विविध थेरपी रूम ( उपचार रूम –वाचा तज्ज्ञ कक्ष, भौतीक चिकित्सक कक्ष, व्यवसायिक कक्ष, मानसशास्त्र तज्ज्ञ रूम) गरजेनुसार उपलब्ध असल्यास चांगलेच आहे. तसेच सर्व सामान्य शाळेत असलेल्या सर्व सुविधा देखील या शाळेत असणे आवश्यक असणे गरजचे आहे.

तसेच सर्व सामान्य मुलाबरोबर शाळेत योग्य व आरामदायक स्थितीत बसता येण्यासाठी बैठक व्यवस्था शाळेत असणे गरजेचे आहे. तसेच शाळेत स्वच्छतागृहमध्ये सामान्य व कमोड पध्दतीचे प्रसाधन गृह , तसेत उंच ठिकाणी चढण्या- उतरण्यासाठी रॅम किंवा लिफ्ट असणे आवश्यक आहे. आपत्ती कालीन परिस्थितीत सर्वसमावेश शाळांकडे त्यासंदर्भातील भौतीक सुविधा असणे आवश्यक ठरते.आपती कालीन परिस्थितीत त्यांना मदत मिळण्यासाठी त्यांच्या दिव्यांग प्रकारनुसार ओळखपत्र असणे गरजेचे असते की ज्या ओळख पत्रावरून अध्यनार्थींची गरज समोरच्यामदतीस व्यक्तीला लक्षात येईल.तसेच व्हिल चेअर , विशेष काठी ( घंटी असलेली पांढरी काठी). तसेच शिक्षणाचा अधिकारानुसार दिव्यांग अध्ययनार्थींना शाळेत येण्या - जाण्यासाठीची परिवहन सेवा –सुविधा असणे देखिल गरजेचे आहे. निवासी प्रकारच्या सर्वसमावेशक शिक्षण देणा-या शाळांमध्ये निवासासाठी दिव्यांग अध्ययनार्थींना सुखकर होईल अशा प्रकारची व्यवस्था असावी.



Vol: 7th, Special Issue , English-Marathi, Quarterly: 29th Dec 2018,ISSN : 2319-5525
UGC Approval No. 63299

याशिवाय दिव्यांग प्रकारानुसार व सामान्य शाळेतील अध्ययनार्थीच्या प्रकारानुसार सर्वसमावेशक शाळेत विशेष व दिव्यांग व सामान्य अध्ययनार्थींना अध्ययन- अध्यापन करतांना भौतीक सेवा- सुविधा असणे आवश्यक ठरते.

२) कार्यक्षम मनुष्यबळः-

कोणत्याही यंत्रणेचे यश हे त्या यंत्रणेत कार्य करणा-या कूशल व कार्यक्षम ,कार्यतत्पर यंत्रणेवर अवंलंबून असते. सर्व समावेशक शिक्षणाला देखील वरील तत्व लागू पडते. सर्व समान्य शाळेच्या माध्यमातून सर्वसमावेशक शिक्षण देतांना सर्वात प्रथम कार्यक्षम मनुष्यबळाचा विचार करावा लागतो.. त्यात शिक्षणक्षेत्रातील विविध स्तरावरील अधिकारी ,शिक्षणयंत्रणेत कार्यकरणारे मनुष्यबळ , शाळेचा मुख्याध्यापक, वर्गशिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती तसेच दिव्यांग अध्ययनार्थींच्या प्रकारानुसार आवश्यक असलेल्या तज्ज्ञ व्यक्तींचा समावेश होतो. त्यात डॉक्टर ,विविध थेरपीस्ट, केअर टेकर (काळजी घेण्यारी व्यक्ती) आहार तज्ज्ञ ,मानसोपचार तज्ज्ञ , तसेच विविध प्रकारानुसार विशेष अध्यापकांच व पालकांचा समावेश होतो.

ब-याचदा पालकांचीच आपल्या पाल्याच्या अवस्थेकडे पाहून अवस्था बिकट झालेली असते. त्यासमोर पाल्याच्या भावी आयुष्याचा गंभीर स्वरूपाचा प्रश्न व सारखी चिंता असते. अशावेळी पालकांना धिर देऊन, त्यांना सर्वसमावेश शिक्षणाचे महत्व समजावून सांगण्याचे कार्य सर्वसमावेशक शिक्षण देणा-या शाळेंच्या व्यवस्थापन मंडळाने व शाळेच्या मुख्याध्यापकाने केले पाहिजे. त्यासाठी सर्वसामान्य शिक्षणासाठी कार्य करणा-या शाळेच्या व्यवस्थापन मंडळाला, मुख्याध्यापक ,तसेच अध्यापक व अध्यापकेतर कर्मचारी यांना दिव्यांग व विशेष अध्ययनार्थींच्या शिक्षणासाठी प्रशिक्षण देणे आवश्यक व गरजेचे ठरते. किंवा प्रत्येक शाळेत किंवा केंद्रीय शाळेत विशेष शिक्षण देणा-या अध्यापकांची गरजेनुसार नियुक्ती करणे आवश्यक आहे. त्याच बरोबर दिव्यांग अध्ययनार्थींच्या प्रकारानुसार ब-याचदा विविध थेरपीस्ट, डॉक्टर - नर्स ,आहार तज्ज्ञ, (काळजी वाहक) केअर -टेकर यांची



Vol: 7th, Special Issue , English-Marathi, Quarterly: 29th Dec 2018,ISSN : 2319-5525
UGC Approval No. 63299

देखील आवश्यकता असते. याशिवाय विविध शैक्षणिक साधनांचा सर्वसमावेशक शिक्षणात कसा करावा, याचे देखिल प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

थोडक्यात म्हणजे सर्वसमावेशक शिक्षण देतांना सर्वसामान्य शाळेत उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाला अधिक सक्षम करण्यासाठी विविध प्रशिक्षणाची नियमित पणे आवश्यकता असत. तसेच गरजेनुसार अशा शाळेतील दिव्यांग व विशेष अध्ययनार्थींना अध्ययन- अध्यापन करण्यासाठी सर्वसामान्य शाळेतील अध्यापकांसारखे ,विशेष शिक्षण देणारे अध्यापक देखील गरजेनुसार नेमणे आवश्यक आहे. याशिवाय शिक्षक- शिक्षणाच्या अभ्यासक्रमात सर्वसमावेशक शिक्षणाचा देखील समावेश करणे आवश्यक आहे. मात्र तो अभ्यासक्रम केवळ सैध्दांनिक असायला नको. तर त्यातून सर्वसमावेशक शिक्षणाबाबतची प्रत्यंक्ष अनुभूती छात्राध्यापकांना मिळायला हवी.

(३) आर्थिक सुविधा-

सर्वसामान्य शाळेच्या माध्यमातून विशेष गरजा असणा-या दिंव्यांग व सामान्य अध्ययनार्थींना शिक्षण देणे म्हणजे केवळ अध्ययनार्थींना लिहता -वाचता येण्यापूरती मर्यादीत बाब नाही. तर सर्व समावेशक शिक्षणाच्या माध्यमातून विशेष .दिव्यांग व सामान्य अध्ययनार्थीमध्ये अध्ययन विषयक कौशल्याचा विकास झाला पाहिजे. तसेच त्यांच्या भावनिक ,सामाजिक व सांस्कृतिक बाबी देखील विकसित झाल्या पाहिजेत. शिवाय सामान्य मुलांबरोबर दिंव्यांग व विशेष मुलांची सामाजिक व सास्कृतिक स्विकृतता देखील महत्वाची ठरते.

त्यामुळे विशेष व दिव्यांग व सामान्य मुलांना सर्वसमावेशक शिक्षण देतांना आवश्यक त्या सोयी- सुविधा तसेच गरजेनुसार साधने खरेदी करण्यासाठी आर्थिक गरज पाहिजे. सर्व सामान्य शाळेत विशेष व दिव्यांग मुलांच्या साठी आवश्यक ते बदल करणे देखील गरजेचे ठरते. तसेच भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आर्थिक सुविधा मिळणे

सर्वसमावेश मुलांच्या विकासाच्या व अध्ययन विकासाच्या दृष्टीने आर्थिक सुविधा आवश्यक आहे.त्यामुळे दिव्यांग प्रकारानुसार अध्ययनार्थीना शैक्षणिक साधने व सुविधा पुरविता येईल.

निष्कर्ष -

१) समाजातील सर्व घटकांना शिक्षण हे सर्वसमावेशक शिक्षण पध्दतीने दिल्यास विशेष व दिंव्याग दिंव्याग अध्ययनार्थीची सामाजिक व सांस्कृतिक स्विकृती होण्यासाठी पोषक वातावरण तयार होते.

२) सर्वसमावेश शिक्षणाच्या यशस्वितेसाठी विशेष ,दिव्यांग व सामान्य अध्ययनार्थीना त्याच्या क्षमतांचा विकास करण्यासाठी भौतीक ,मानवी व आर्थीक सुविधा महत्वाच्या आहेत.

३) विशेष व दिव्यांग अध्ययनार्थीचे अध्ययन परिणामकारक होण्यासाठी त्यांना विविध शैक्षणिक साधने सर्वसमावेश शाळेत असणे गरजेचे आहे.

शिफारशी -

१) सर्वसमावेशक शिक्षण देणा-या शालेत अध्ययन करणा-या अध्ययनार्थीसाठी शासनाने व त्या शाळेच्या व्यवस्थापन मंडळाने सर्व सुविधा उपलब्ध करून दयाव्या.

२) सर्व सामान्य शाळेत अध्ययन करणा-या अध्ययनार्थीचे अध्ययन परिणाम कारक होण्यासाठी विशेष सुविधा बरोबरच विशेष शिक्षकांची, तसेच काळजी घेणा- व्यक्तीची, वैद्यकिय,मानसशास्त्राशी संबंधित व इतर संबंधित क्षेत्रातील व्यक्तीची नेमणूक करण्यात यावी.

३) सर्वसमावेश शिक्षणासाठी सर्वच सामान्य शाळेतील अध्यापकांना सर्वसमावेश शिक्षणाचे प्रशिक्षण देण्यात यावे.

सारांश

शालेय स्तरावर समावेशित शिक्षणाची अमंलबजावणी करीत असतांना काही भौतीक , मानवी व आर्थिक घटकांची पूर्तता होणे आवश्यक व गरजेचे आहे. अशा भौतीक , मानवी



Vol: 7th, Special Issue , English-Marathi, Quarterly: 29th Dec 2018,ISSN : 2319-5525
UGC Approval No. 63299

व आर्थिक घटकांच्या उपलब्धतेशिवाय शालेय स्तरावरील समावेशित शिक्षणाला दिशा व गती प्राप्त होणार नाही. उच्च शिक्षणाचा पाया मजबूत करण्यासाठी आवश्यक गरजांची पूर्तता करणे आवश्यक ठरते. सदरील पेपर मध्ये शालेय स्तरावरील समावेशित शिक्षणाचा याच भौतीक , मानवी व आर्थिक घटकांच्या दृष्टीने विचार मांडण्यात आलेला आहे

## संदर्भ ग्रंथ सूची:


१) त्रिपाठी लालबचन, (१९८३), मनोवैज्ञानिक अनुसंधान पध्दती, हरप्रसाद, भार्गव, आगरा.

२) मानसशास्त्र परिभाषा कोष, (१९९१), भाषा संचालनालय ,मुंबई प्रकाशन.

३) मुखापाध्याय म. (२००१), शिक्षणातील सर्वांगीण गुणवत्ता व्यवस्थापन ,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे.

४) अरुणकुमार सिंह, (२०००), उच्चतर सामान्य मनोविज्ञान, मोतीलाल बनारसीदास ,दिल्ली.

५) संध्या लिमये, (२०१६) ,योजना मासिक , (लेख-दिव्यांग बांधवांचा सर्वसमावेशक प्रवास ), मुंबई.

६) इंदुमतीराव, (२०१६), योजना मासिक , (लेख-शैक्षणिक धोरण आणि दिव्यांग), मुंबई.

७) भारत सरकार राजपत्र, (२०१६), दिव्यांगजन अधिकार अधिनियम, २०१६.

८) महाराष्ट्र शासन- शालेय आपत्ती व्यवस्थापन नियोजन

९) महाराष्ट्र शासन राजपत्र-असाधारण भाग चार-अ, (२०१२), बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम ,२००९

१०) महाराष्ट्र शासन राजपत्र-असाधारण भाग चार-अ, (२०१२), बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम ,२०११




Vol: 7th, Special Issue , English-Marathi, Quarterly: 29th Dec 2018,ISSN : 2319-5525
UGC Approval No. 63299